# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरवनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे— ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/२२३५ दिनांक : २८/०६/२०१७

**महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालय/संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे—०७.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७—१८ साठी महाविद्यालय स्तरावर विविध अभ्यासक्रमासाठी होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेबाबत....

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७—१८ साठी महाविद्यालय स्तरावर विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेशाची कार्यवाही सुरू आहे. प्रवेश प्रक्रिया राबविताना विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी, प्रवेशासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी तसेच विविध अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने विहित केलेले शुल्क इ. बाबतची माहिती महाविद्यालयाने आपल्या सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तथापी, काही महाविद्यालयाकडून अशा प्रकारची कार्यवाही केली जात नसल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवेशाबाबत वेळेत माहिती उपलब्ध होत नाही. त्यामुळे निवड होवूनही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात.

तरी, प्रवेश प्रक्रिया राबविताना महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी, प्रवेशासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी, तसेच विविध अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने विहित केलेले शुल्क इ. बाबतची माहिती सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. जेणेकरून विद्यार्थ्यांना प्रवेश घेताना अडचणी निर्माण होणार नाही. याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला

28/6/2017

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत : माहितीकरीता

मा. संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे—१.
मा. कुलगुरू, यांचे कार्यकारी सहायक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे —७
मा. कुलसचिव, यांचे स्वीय सहायक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे —७

Desktop/vidita/circulars